**PUNE DISTRICT EDUCATION ASSOCIATION'S**

# SETH GOVIND RAGHUNATH SABLE COLLEGE OF PHARMACY

**SASWAD, DIST-PUNE**

## News of activities conduced in the academic year 2022-23

---

# माजी उपमुख्यमंत्री पवार यांच्या वाढदिवसानिमित्त

# फार्मसी महाविद्यालयात विविध उपक्रम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**सासवड :** महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विरोधी पक्षनेते व पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अतिशय संवेदनशील मनाचे, कार्यकुशल, तडफदार नेतृत्व मा. ना. अजितदादा पवार यांच्या ६३ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे सेठ गोविंद रघुनाथ साबळे पदवी व पदविका फार्मसी महाविद्यालय, सासवड येथे विविध उपक्रम राबवण्यात आले.

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, मानद सचिव, संदीप कदम, खजिनदार मोहनराव देशमुख, उपसचिव एल. एम. पवार, सहाय्यक सहसचिव ए. एम. जाधव व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण पूरक उपक्रम म्हणून सोनोरी मल्हारगड पायथ्याशी वृक्षारोपण करण्यात आले. तसेच सामाजिक साहाय्य म्हणून जीवनवर्धिनी निवासी मतिमंद विद्यालय दिवे, सासवड येथे महाविद्यालयातर्फे खाऊ वाटप करण्यात आला. तसेच पर्यावरणाला घातक असलेले प्लास्टिक विषयी विद्यार्थ्यांमार्फत सासवड शहरामध्ये पथनाट्याद्वारे जनजागृती करण्यात आली व वाघिरे महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुषमा भोसले यांच्या उपस्थितीत महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्लॅस्टिकच्या वस्तू संकलित करून सागर मित्र अभियान-पुणे यांच्याकडे देण्यात आले व हा उपक्रम कायमस्वरूपी महाविद्यालयात राबवण्यात येणार आहे. तसेच निबंध स्पर्धा, राज्यस्तरीय सायकल स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, व्हाट्सअँप कोट व स्लोगन स्पर्धा, इ-पोस्टर प्रेझेन्टेशन, व्याख्यान, लॅबोरेटरी सेफ्टी प्रॅक्टिस यावर कार्यशाळा इ. उपक्रम घेण्यात येणार आहेत. या उपक्रमामध्ये शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी सहभागी आहेत.

# साबळे फार्मसी महाविद्यालयात स्वातंत्र्याच्या अमृत मोहोत्सवानिमित्त उपक्रम

**सासवड / प्रतिनिधी**

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे शेठ गोविंद रघुनाथ साबळे फार्मसी पदवी व पदविका महाविद्यालय सासवड येथे  स्वातंत्र्याच्या अमृत मोहोत्सवानिमित्त १३ ऑगस्ट ते १६ ऑगस्ट यादरम्यान महाविद्यालयात विविध उपक्रम घेण्यात येणार आहेत. यामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या  'लार्जेस्ट ओंलीने अल्बम ऑफ पीपल होल्डिंग नॅशनल' या गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड उपक्रमा अंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले. तसेच ' हर घर तिरंगा', सासवड तहसीलदार कार्यालय मशाल प्रभारतफेरी, सामुहिक राष्ट्रगीत, देशभक्तीपर गीत, माजी सैनिक यांचे व्याख्यान आयोजन, निबंध स्पर्धा असे विविध उपक्रम महाविद्यालयात राबविण्यात येणार आहेत  अशी माहिती महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण यांनी दिली. या सर्व कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

# साबळे फार्मसी महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा

**सासवड / प्रतिनिधी**

'शिकवता शिकवता आपणास आकाशाला गवसणी घालण्याचे सामर्थ्य देणारे आदराचे स्थान म्हणजे शिक्षक' याच वाक्याला अनुसरून आज ५ संप्टेंबर शिक्षक दिन आणि भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन सर्वपल्ली यांची जयंती याचे औचित्य साधून पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे शेठ गोविंद रघुनाथ साबळे कॉलेज ऑफ फार्मसी व शेठ गोविंद रघुनाथ साबळे कॉलेज ऑफ फार्मसी पॉलीटेकनिक सासवड येथे शिक्षक दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला राष्ट्रपती पुरस्कार विजेते प्रा. अरुण सुळगेकर - आजीव सेवक श्री स्वामी विवेनंद शिक्षण संस्था कोल्हापूर यांची प्रमुख उपस्तीथी लाभली. प्रा. अरुण सुळगेकर यांनी मार्गदर्शन करताना शिक्षकांचे अनन्यसाधारण महत्त्व पटवून दिले. तसेच शैक्षणिक साक्षरता यावर सखोल मार्गदर्शन केले. तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. राजश्री चव्हाण यांनी मार्गदर्शन करताना जसा विद्यार्थ्यांना अडथळा येतो तसाच शिक्षकांनाही येतो परंतु त्यातूनही शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांपर्यें त पोहचत असतो हा उत्तम शिक्षकाचा स्वभाव आहे हे यातून स्पष्ट होते. शिक्षक हा विद्यार्थी घडवण्याचे ध्येय उराशी बाळगून विद्यार्थ्यांसमोर कायम उभा राहतो हे ही मॅडमनी पटवून दिले.व सामाजिक प्रसार माध्यमे उपलब्ध आहेत ते चोख वापरले पाहजेत हा कानमंत्र विद्यार्थ्यांना दिला. तसेच या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थी कु. श्वेता बोबडे, कु. सुजाता यादव, कु.धनश्री साळुंखे, कु. रीमा गायकवाड यांनी आपले मनोगत व्यक्त केले तसेच विद्यार्थ्यांनी एक दिवसीय शिक्षकांचा रोल निभावत लेक्चर घेतले. तसेच अध्यापन सोबत शिक्षक पुस्तक लेखनही करतात अश्या शिक्षकांचा सत्कार महाविद्यालयामध्ये करण्यात आला.


**जाहीर व**

सर्वसाधारणपणे जनतेला जाहीर नोटीसीच्या
महिंद्रा बँक लिमिटेडने खाली दिलेल्या वाहनां

१) **बोलेरो पिक अ‍ॅप MH14HU4233**
**किमान राखीव किंमत : ३३५२१०/**
२) **Sany Excavator SY 210C 19S**
**किमान राखीव किंमत : २४५००००,**
३) **टाटा Ace Zip MH50N1632 वा**
**किमान राखीव किंमत : १०००००/**
४) **अशोक लेलँड 3118 COWL CHA**
**वायओएम –२०१९**
**किमान राखीव किंमत : १३४७४५६,**

मेसर्स कोटक सह महिंद्रा बँक त्याच्या हायप
ज्या स्थितीत आहे, त्या स्थितीत विक्री करण
इच्छुक खरेदीदारांनी खालील पत्त्यावर ऑनला
१५ दिवसांच्या आत किंवा २१.०९. २०२२
शाखेचा पत्ता : कोटक महिन्द्रा बँक लि
झोन पश्चिम–३, सम्राट अशोक रोड, न
४११००६ किंवा

**संपर्क/०२० –६७४४३६९२ ईमेल : Ra**

सकाळ श्रीकृष्ण नेवसे

# सासवड येथे प्राध्यापकांचा सत्कार

**सासवड :** पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या साबळे औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालयात शिक्षक दिन राष्ट्रपती पुरस्कार विजेते प्रा. अरुण सुळगेकर यांच्या उपस्थितीत साजरा झाला.

यानिमित्ताने अनुभवी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात शिक्षकांची एक दिवसीय भूमिका बजावून मूळच्या प्राध्यापकांना थोडी उसंत दिली. शिवाय काही प्राध्यापक ज्ञानदानासह पुस्तक लेखनही करतात. अशांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास राष्ट्रपती पुरस्कार विजेते व श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूरचे अजीव सेवक प्रा. अरुण सुळगेकर यांची उपस्थिती लाभली. या वेळी उप-प्राचार्या डॉ. स्मिता पवार, प्रा. सागर भिसे, प्रा. दीपाली जगताप, प्रा. प्रज्ञा जगताप, प्रा. पायल बोरावके, प्रा. अश्विनी कुंजीर आदी उपस्थित होते.

श्वेता बोबडे, सुजाता यादव, धनश्री साळुंखे, रीमा गायकवाड या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण, प्रा. विशाखा गायकवाड, प्रा. सागर भिसे, प्रा. दीपाली जगताप व प्रा. हनुमंत पाटील या शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

# साबळे विद्यालयात फार्मासिस्ट दिन

**सासवड शहर, ता. २६ :** सासवड (ता. पुरंदर) येथे शेठ गोविंद रघुनाथ साबळे पदवी व पदविका औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय जागतिक फार्मासिस्ट दिन व राष्ट्रीय सेवा योजना दिन उत्साहात साजरा झाला. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी स्लोगन मेकिंग स्पर्धा व रॅली आयोजित केली.

याप्रसंगी नसरापूरचे माजी प्राचार्य डॉ. नारायण टाक, अभिजित लडकत यांची व्याख्याने झाली. बाळासाहेब भिंताडे, नीलेश डाकले, संतोष ढमाळ, अरुण खेनट, स्वप्नील पवार, संतोष कुंभार आदी उपस्थित होते. प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन प्रा. जितेंद्र शिंदे, प्रा. पायल बोरावके, प्रा. पद्मजा म्हस्के यांनी केले. अंकिता भोसले, शीतल कस्तुरे व आभार प्रा. वैभव शिळीमकर यांनी केले.

सकाळ : दत्ता भोंगळे

# जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त सामाजिक जनजागृती रॅली

■ **राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क**

**सासवड :** पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे शेठ गोविंद रघुनाथ साबळे पदवी व पदविका औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय सासवड येथे जागतिक फार्मासिस्ट दिन उत्साहात साजरा करण्यात आला व सामाजिक जनजागृती रॅली आयोजित करण्यात आली. या रॅलीमध्ये महाविद्यालयाच्या सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन आपण फार्मासिस्ट असून समाजातील सर्व लोकांचे आरोग्य निरोगी राहण्यासाठी सासवड शहरामध्ये जनजागृती केली. समाजातील लोकांचे आरोग्य निरोगी असणे ही आपली जबाबदारी आहे असा प्रत्येक फार्मासिस्ट समजतो. या अनुषंगाने महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक यांनी मोठ्या प्रमाणात शहरातील परिसरामध्ये विविध आजार व त्यांच्यावरील उपाय तसेच आजार होऊ नये म्हणून घ्यावयाची काळजी यांची जनजागृती केली. हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. रॅलीचे आयोजन प्रा. वैभव शिळीमकर, प्रा. पायल बोरावके, प्रा. पद्मजा म्हस्के यांनी केले.

| पुणे, शनिवार, ८ ऑक्टोबर २०२२ |
सकाळ : दत्ता भोंगळे



# सासवड येथे साबळे फार्मसी महाविद्यालयाची जनजागृती रॅली



सासवड (ता. पुरंदर) : महाविद्यालयातील रॅलीप्रसंगी विद्यार्थी.

**सासवड शहर, ता. ७ :** सासवड (ता. पुरंदर) येथे पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे शेठ गोविंद रघुनाथ साबळे पदवी व पदविका औषध निर्माणशास्त्र महाविद्यालयात जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त सामाजिक जनजागृती रॅली आयोजित केली होती. या रॅलीमध्ये महाविद्यालयाच्या सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन आपण फार्मासिस्ट असून समाजातील सर्व लोकांचे आरोग्य निरोगी राहण्यासाठी सासवड शहरामध्ये जनजागृती केली. हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली घेतला. रॅलीचे आयोजन प्रा.वैभव शिळीमकर, प्रा. पायल बोरावके, प्रा. पद्मजा म्हस्के यांनी केले.

प्रतिनिधी: चंद्रकांत चौंडकर

# साबळे फार्मसी महाविद्यालय सासवड येथे पर्यावरण जनजागृती सप्ताह

पुरंदर : पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे सेठ गोविंद रघुनाथ साबळे फार्मसी महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत ' पर्यावरण जनजागृती सप्ताह' साजरा करण्यात आला. या सप्ताहामध्ये महाविद्यालयात पर्यावरण शाबूत राहण्यासाठी व पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी विविध कार्यक्रम घेण्यात आले. यामध्ये वाहनांपासून प्रदूषण टाळण्यासाठी 'नो वेहिकल' दिवस पळाला गेला. तसेच महाविद्यालयातील सर्वांनी सासवड शहरामध्ये पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी सर्वांना संदेश देण्यासाठी जनजागृती रॅली काढली. महाविद्यालयातील परिसरात व मल्हार गड येथे वृक्षारोपण करण्यात आले. तसेच निसर्ग संवर्धन या विषयावर धनंजय शेडबाळे-अध्यक्ष एन. जी. ओ. सावरकर मंडळ फ्रेंड्स ऑफ नेचर विंग यांनी पर्यावरणाचे रक्षण का करायचे याचे महत्व पटवून दिले. तसेच महाविद्यालयाची परिसर स्वच्छता करण्यात आली. आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी पर्यावरणपुरक टाकाऊ पासून टिकाऊ या विषयावर स्पर्धा घेण्यात आली. हा सर्व सप्ताह महाविद्यालयाचे प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आल्या. या कार्यक्रमाला महाविद्यालयाच्या उप-प्राचार्या डॉ. स्मिता पवार, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. या सप्ताहाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. जितेंद्र शिंदे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. प्रज्ञा यादव हिने केले.

# साबळे फार्मसी महाविद्यालयात पर्यावरणाबाबत जनजागृती

**सासवड शहर, ता. १३ :** पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या सेठ गोविंद रघुनाथ साबळे फार्मसी महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत 'पर्यावरण जनजागृती' सप्ताह साजरा करण्यात आला. या सप्ताहामध्ये महाविद्यालयात पर्यावरण व्यवस्थित राहण्यासाठी व पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी विविध कार्यक्रम घेण्यात आले.

सासवड (ता. पुरंदर) येथे वाहनांपासून प्रदूषण टाळण्यासाठी 'नो व्हेईकल' दिवस पळाला गेला. सासवड शहरामध्ये पर्यावरणाचे रक्षणाचा संदेश देण्यासाठी जनजागृती रॅली काढली. महाविद्यालयातील परिसरात व मल्हार गड येथे वृक्षारोपण करण्यात आले. तसेच निसर्ग संवर्धन या विषयावर एन. जी. ओ. सावरकर मंडळ फ्रेंड्स ऑफ नेचर विंगचे अध्यक्ष धनंजय शेडबाळे यांनी पर्यावरणाचे रक्षण का करायचे याचे महत्त्व पटवून दिले. हा सर्व सप्ताह महाविद्यालयाचे प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. या कार्यक्रमाला महाविद्यालयाच्या उप-प्राचार्या डॉ. स्मिता पवार, सर्व शिक्षक उपस्थित होते. या सप्ताहाचे आयोजन राष्ट्रीय सेवा अधिकारी प्रा. जितेंद्र शिंदे यांनी केले.

सकाळ : दत्ता भोंगळे

# सासवड येथे संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा

■ **राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क**

**सासवड :** येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या शेठ गोविंद रघुनाथ साबळे पदवी व पदविका औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. संविधान दिन किंवा राष्ट्रीय विधी दिन हा २६ नोव्हेंबर रोजी भारतभर साजरा केला जातो.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. कलाताई फडतरे यांची उपस्थिती लाभली. त्यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संविधान म्हणजे काय, त्यात येणारे घटक, कलम, माहिती अधिकार, राज्यघटना, हक्क याबाबतची सविस्तर माहिती दिली. या वेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना संविधान कसे तयार झाले आणि संविधानाचे महत्त्व पटवून सांगितले. प्रा. प्रज्ञा जगताप विद्यार्थी विकास अधिकारी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व मूलभूत कर्तव्य याची माहिती दिली.

कार्यक्रमात प्रा. पायल बोरावके यांनी सर्वांना संविधानाची शपथ दिली. प्रा. प्रज्ञा जगताप, प्रा. पायल बोरावके, प्रा. अश्विनी कुंजीर यांनी आयोजन केले. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी प्रज्ञा यादव केले. आणि प्रा. अश्विनी कुंजीर यांनी आभार मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. स्मिता पवार, महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# 'साबळे फार्मसी'मध्ये संविधानाची शपथ

सासवड शहर, ता. २७ : सासवड (ता. पुरंदर) येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या शेठ गोविंद रघुनाथ साबळे पदवी व पदविका औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा केला. विद्यार्थ्यांना संविधान म्हणजे काय, त्यात येणारे घटक, राज्यघटना, हक्क याबाबतची सविस्तर माहिती अॅड. कला फडतरे यांनी दिली. या वेळी प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्त्व पटवून दिले. प्रा. प्रज्ञा जगताप विद्यार्थी विकास अधिकारी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व मूलभूत कर्तव्य यांची माहिती दिली. तसेच या कार्यक्रमात प्रा. पायल बोरावके यांनी सर्वांना संविधानाची शपथ दिली. प्रा. अश्विनी कुंजीर यांनी कार्यक्रमाच्या आयोजनात पुढाकार घेतला. उपप्राचार्या डॉ. स्मिता पवार, महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. प्रज्ञा यादव हिने सूत्रसंचालन केले.

सकाळ : दत्ता भोंगळे

# आंबळे येथे राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत श्रमसंस्कार शिबिर

■ **राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क**

**सासवड :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे सेठ गोविंद रघुनाथ साबळे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय सासवड यांच्या सयुंक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विशेष श्रमसंस्कार शिबिर आंबळे ता. पुरंदर येथे पार पडले. या शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण, उप-प्राचार्या डॉ. स्मिता पवार, विद्या म्हस्के हजर होते. या शिबिराचा हेतू महिला आरोग्य सर्वेक्षण, वारसा समाजासाठी जगण्याचा, विद्यार्थ्यांच्या सप्तगुणांची ओळख, आरोग्यविषयक मागदर्शन हा होता. तसेच शिबिरात सचिन गदादे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल माहिती देऊन त्यांचा आदर्श घेऊन जीवन आत्मज्ञानानं जगले पाहिजे, असे मत व्यक्त केले. दत्तात्रय जगताप यांनी शास्त्रीय संगीत व त्याचे महत्त्व पटवून दिले. एस.एम. शिंगटे यांनी संसर्गजन्य रोगांपासून संरक्षण आणि उपचार पद्धती सांगितल्या. सचिन कुदळे यांनी बालविवाह प्रतिबंधक कायदा व लैंगिक अत्याचार विरोधी कायदा याविषयी जनजागृतीपर व्याख्यान दिले.

डॉ. संजय लांडगे यांनी व्यवसाय शिक्षण काळाची गरज या विषयावर चर्चा केली. नीलेश भोसले यांनी औषधाचा वापर समज गैरसमज या विषयावर मार्गर्शन केले. तसेच मार्गदर्शन करताना एनएसएस मधे सहभागी होण्याचं फायदे व गरज पटवून दिली. अशा विविध विषयांवर स्वयंसेवकांना शिबिरात मार्गदर्शन करण्यात आले.

P. Chavan

PRINCIPAL
PUNE DISTRICT EDUCATION ASSOCIATION'S
SETH GOVIND RAGHUNATH SABLE
COLLEGE OF PHARMACY, SASWAD
TAL. PURANDHAR, DIST. PUNE-412 301